जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०५/१२/२०२३
## दि.०४/१२/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

### भाग-१ ते ५ चे गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ८०४/२०२३,भादविक ३२४,३२३,५०४,महा.पो.का.क.३७(१)१३५,आर्म ॲक्ट ४(२५),क्रिमीनल लॉ अमेंन्डमेंट ॲक्ट क.३ व ७ |
| **फिर्यादी** | वसंत गालफाडे,वय- २८ वर्षे,रा.सर्वे नं.११५,येरवडा,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०३/१२/२०२३ रोजी रात्री २२/०० वा. दुर्गा माता मंदिरा जवळ,राजू गांधी नगर,मेंटल कॉर्नर,येरवडा,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे जेवण झाल्यावर घराजवळील दुर्गा माता मंदिराच्या कट्टयावर बसले असताना,फिर्यादी यांचेच परिसरात राहणारा यातील नमुद इसमाने दुचाकीवरुन येवुन,तु इथे का बसला आहे,इथे बसायचे असेल माझे ऐकायला पाहिजे असे बोलून फिर्यादीचे डोक्यात टपली मारून,त्याचेकडील धारधार हत्या-याने फिर्यादीचे डाव्या हातावर मारून,त्यांना दुखापत करुन जखमी केले. तसेच त्याचेकडील धारधार हत्यार हवेत फिरवुन,सदर परिसरात दहशत निर्माण केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. लहाने ८८८८८१३६४७ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे १८३५/२०२३,भादविक ३९४,३४१,३२३,५०६,३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय ४८ वर्ष,रा.जिवननगर,शेवाळवाडी,पुणे |
| **आरोपीत** | १.अभिषेक ऊर्फ नयन हरिदास भोसले,वय २१ वर्षे,रा.शेवाळवाडी,जिवन बापु चाळ,शेवाळवाडी मांजरी,पुणे २.प्रथमेश इंदवे,वय २० वर्षे,रा.गोपाळपट्टी मांजरी-बुद्रुक,पुणे (अटक) व इतर एक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०३/१२/२०२३ रोजी रात्री २०/४५ वा.शेवाळवाडी स्मशानभुमी रोड,जिवन बापु चाळ शेवाळवाडी,मांजरी,पुणे येथील सार्वजनिक रस्त्यावर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे मांजरी फार्म येथुन त्यांचे राहते घरी येत असताना,यातील नमुद इसमांनी फिर्यादी यांना स्मशानभुमी जवळ आडवुन,त्यांचे हात पकडुन त्यांचे शर्टच्या वरच्या खिशातील ३,०००/- रुपये रोख रक्कम व पँटच्या खिशातील मोबाईल असा एकुण ०८,०००/-रू किचा ऐवज जबरदस्तीने हिसकावून घेवुन,जास्त आरडा-ओरडा करशील तर,तुला कापुनच टाकेन अशी धमकी देवुन,हाताने मारहाण करुन जखमी केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. संतोष गोरे ८९७५२४५१०० |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ८०६/२०२३,भादविक ३०६,५०४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-३७ वर्षे,रा.सर्वे नं.५,पवार वस्ती,केशवनगर,मुंढवा,पुणे |
| **आरोपीत** | एक अल्पवयीन मुलगी (ताब्यात नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २०/११/२०२३ रोजीपासून ते दि.०१/१२/२०२३ रोजीपर्यंत लक्ष्मीनगर,येरवडा,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा अल्पवयीन मुलगा,वय-१६ याचे लक्ष्मीनगर,येरवडा येथील नमुद अल्पवयीन मुलीसोबत ओळख होती. परंतु अलीकडे काही दिवसांपासून ती त्याचे सोबत नीट बोलत नव्हती तसेच मला तुझ्या सोबत बोलायचे नाही असे वारंवार बोलुन,तीचे अशा वागण्याने त्याला मानसिक त्रास होत होता. त्या दरम्यान दि.०१/१२/२०२३ रोजी त्याचे आजीचे लक्ष्मीनगर येरवडा येथील घरी येवुन,तीचेसोबत पुन्हा त्याच कारणावरून बोलत असताना,तीने त्याचेशी वाद व शिवीगाळ करून,त्याचेशी बोलणे टाळल्या मुळे तीचेकडुन होत असलेल्या मानसिक त्रासातून फिर्यादीचा अल्पवयीन मुलगा यास त्याचे आजीचे घरी गळफास घेवुन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. जमदाडे ९५५२५१५२३८ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे ३२३/२०२३,भादविक ३०४(अ),२७९,मो.वा.का.क.११९/१७७,१८४,१३४(१) (ब) |
| **फिर्यादी** | शशीकला मादीवाना,वय-५७ वर्षे,रा.शंकर सोसायटी,गुलटेकडी,पुणे |
| **आरोपीत** | कारवरील चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०४/१२/२०२३ रोजी पहाटे ०५/०० वा.ते ०५/३० वा.चे सुमारास स्विस कॅफेचे समोर, पुनावाला गार्डन ते महर्षीनगर पोलीस चौकीकडे जाणा-या रोडवर,सॅलीसबरी पार्क,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे ओळखीचे शंभुजी लाल,वय-८५ रा.५५/३/१,आशियाना बंगलो,सॅलसबरी पार्क,गुलटेकडी,पुणे हे त्यांचे राहते घराचे जवळ पायी रस्ता क्रॉस करीत असताना,यातील नमुद एका कारवरील चालकाने,त्याचे ताब्यातील कार ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी शंभुजी लाल यांना जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. राहुल कोळंबीकर ९४०४९०११११ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे ३२४/२०२३,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-५०वर्षे,रा.मु.पो.कोळकी,ता.फलटण,जि.सातारा |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/१२/२०२३ रोजी सकाळी ०९/१५ ते दुपारी १२/०० वा.चे दरम्यान नायगाव ते स्वारगेट व स्वारगेट ते पुणे स्टेशन असा एस.टी. बसने प्रवास करीत असताना |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया नायगाव ते स्वारगेट व स्वारगेट ते पुणे स्टेशन असा एस.टी.बसने प्रवास करीत असताना,सदर बस प्रवासा दरम्यान,कोणीतरी अज्ञात व्यक्तीने,बस मधील गर्दिचा फायदा घेवुन,फिर्यादी यांची नजर चुकवुन गाठ बांधुन ठेवलेला रूमाला मधील सोन्याचे मंगळसुत्र व १०००/- रूपये रोख रक्कम असा एकुण ८६,०००/- रू किचा ऐवज त्यांचे पर्स मधुन काढुन चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, के.एम.अष्टेकर ८३०८४०२८०० |
| **६** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | उत्तमनगर पो स्टे १२४/२०२३,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-३२ वर्षे,रा.खडकवाडी,ता.हवेली,जि.पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिंनाक ३०/११/२०२३ रोजी ०९/३० ते दि.०१/१२/२०२३ २०/३० वा.चे दरम्यान एन.डी.ए. रोड,शिवणे,पुणे येथे निलेश दुधाने यांचे गाळा नं.४,व्यंकटेश इलेक्ट्रिक सामानाचे रिटेल व होलसेल विक्रीचे दुकानात |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे व्यंकटेश इलेक्ट्रिकल्स नावाचे इलेक्ट्रिक सामानाचे रिटेल व होलसेल विक्रीचे दुकान आहे. त्यांचे दुकान कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादी यांचे व्यंकटेश इलेक्ट्रीकल्स दुकानाचे मागील बाजुचा लोखंडी पत्रा कशाचेतरी सहाय्याने उघडुन,त्यावाटे आत मध्ये प्रवेश करुन,दुकानातील ड्राव्हर मध्ये ठेवलेली २,५००/- रोख रक्कम चोरी करुन नेली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, डबडे ९६२३२११००० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**